Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# गोंदिया जिल्हयातील नगरपालिका व नगरपालिका कार्यशासन यांची कर्तव्ये व कार्ये

**प्रा.डॉ. राजेश एम.बन्सोड**
**वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख**
एम.कॉम.,एम.ए.(अर्थ.),एम.फिल.,पीच.डी.,सेट.
सी. जे. पटेल महाविद्यालय, तिरोडा

**प्रास्तवना :**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 आणि महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा सुधारणा अधिनियम, 1994 नुसार ठरवून दिलेल्या गोंदिया जिल्हयातील नगरपालिकांचे कार्यक्षेत्र नगरपालिका परीसर व त्या परीसराशी संलग्नीत क्षेत्र आहे.

1 एप्रिल 1920 मध्ये नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर पहिले नगराध्यक्ष होण्याचा मान सेठ 'रामप्रताप लक्ष्मण अग्रवाल' यांना मिळाला. तर पहिले मुख्यधिकारी म्हणून 'जी.व्ही.काने' यांनी काम पाहिले. गोंदिया शहराची तेव्हा लोकसंख्या केवळ 20 हजार होती.




मात्र आज शहराची लोकसंख्या 1 लाख 20 हजार 632 वर पोहोचलेली आहे. आधी नगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या 20 हजार असल्याने तेव्हा नगरपालिका मधील नगरसेवकांची संख्या 10 होती. यानंतर जसा शहराचा विस्तार होत गेला व लोकसंख्या वाढत गेली तसी नगरसेवकांची संख्या देखील वाढविण्यात आली. सन 2011 मध्ये नगरसेवकांची संख्या 40 वर पोहचलेली असून आधीच्या 40 वार्डाचे रूपांतर 10 प्रभागात विभाजन झाले आहे. षहराचे एकूण क्षेत्रफळ 18 स्केअर कि.मी.आहे.

तिरोडा नगरपालिकेची स्थापना सन 1952 मध्ये करण्यात आली आणि येथूनच पुढे तिरोडा नगरपालिकेची वाटचाल सुरू झाली. सुरूवातीला 09 असलेल्या नगरसेवकांची संख्या आता 17 वर पोहचलेली आहे.




सन 1952 मध्ये नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर पहिले नगराध्यक्ष होण्याचा मान स्व. रघुनाथ झारारीया यांना मिळाला. तिरोडा शहराची तेव्हा लोकसंख्या केवळ 17 हजार होती. सन 1956 मध्ये मध्यप्रांत पासून वेगळे झाल्यानंतर महाराश्ट्रामध्ये मिळविण्यात आले त्यावेळी लोकसंख्या 51 हजार 268 वर पोहोचलेली आहे. आधी नगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या 17 हजार असल्याने तेव्हा नगरपालिका मधील नगरसेवकांची संख्या 09 होती. यानंतर जसा शहराचा विस्तार होत गेला व लोकसंख्या वाढत गेली तषी नगरसेवकांची संख्या देखील वाढविण्यात आली. सन 2011 मध्ये नगरसेवकांची संख्या 17 वर पोहोचलेली असून आधीच्या 17 वार्डांचे रूपांतर 4 प्रभागात विभाजन झाले आहे.

**1.नगरपालिका व नगरपालिका कार्यशासनाची कर्तव्य व कार्ये :—**

नगरपालिकांच्या कार्यांची आवश्यक कार्ये व ऐच्छिक कार्ये अशा प्रकारांत विभागणी केली जाते. जी कार्ये करणे अधिनियमातील तरतुदींनुसार नगरपालिकेवर बंधनकारक असते, त्या कार्यांना 'आवश्यक किंवा अनिवार्य कार्ये' असे म्हटले जाते. याउलट ती कार्ये करावयाची की नाही, ते नगरपालिकेच्या इच्छेनुसार किंवा तिच्या क्षमतेवर अवलंबून असते अशा कार्यांना 'ऐच्छिक कार्ये' असे म्हटले जाते. थोडक्यात, ऐच्छिक स्वरूपाची कार्ये करण्यासंबंधी नगरपालिका आपल्या आर्थिक क्षमतेनुसार निर्णय घेण्यास स्वतंत्र असते. तिची आर्थिक स्थिती चांगली असेल तर ती ऐच्छिक कार्यांची जबाबदारी अंगावर घेऊ शकते.

**अ) नगरपालिका व नगरपालिका कार्यशासनाची अनिवार्य कर्तव्य व कार्ये :—**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 या अधिनियमात अन्यथा तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त एखाद्या नगरपालिका क्षेत्राच्या नगरपालिकेचे शासन नगरपालिकेकडे निहीत असतो. हा अधिनियम किंवा त्या वेळी अमलात आलेला कोणत्याही इतर कायद्याव्दारे किंवा त्यान्वये तिच्यावर लादण्यात आलेल्या कर्तव्याशिवाय नगरपालिका क्षेत्राच्या

सीमेतील पुढील बाबींचे आणि जेव्हा परिणामकारक उपाययोजना करणे अन्यथा शक्य नसेल तेव्हा, वरील सीमेबाहेरील पुढील बाबींचे काम हाती घेणे आणि त्या विषयासाठी वाजवी तरतूद करणे हे प्रत्येक नगरपालिकेचे कर्तव्ये आणि आवश्यक कार्ये असते. नगरपालिकेची काही महत्वाची कर्तव्ये आणि आवश्यक किंवा अनिवार्य कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील. :–

1) सार्वजनिक रस्ते, जागा व इमारती अशा ठिकाणी दिवाबत्तीची सोय करणे.

2) सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी नियोजन, नागरी वनीकरण, पर्यावरण रक्षण अशा गोष्टींना चालना देणे.

3) सार्वजनिक रस्ते व जागांवर पाणी शिंपडणे.

4) सार्वजनिक रस्ते व जागा तसेच सार्वजनिक उपभोगासाठी असलेल्या खुल्या जागा यांची स्वच्छता ठेवणे आणि अशा जागांवरील अपायकारक झाडे–झुडपे काढून टाकणे.

5) गावात लागणा–या आगी विझविण्यासाठी योग्य साधनसामग्रीसह अग्निशामक दल तयार ठेवणे आणि आग लागल्यास मिच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे रक्षण करणे.

6) त्रासदायक किंवा विघातक व्यवसाय किंवा प्रथा यावर नियंत्रण ठेवणे किंवा त्या नष्ट करणे.

7) सार्वजनिक रस्ते किंवा जागा तसेच लोकांच्या उपभोगासाठी खुल्या असलेल्या रिकाम्या जागा यावरील अडथळे काढून टाकणे.

8) धोक्याच्या इमारती किंवा जागा सुरक्षित करणे किंवा त्या पाडून टाकणे.

9) मृतदेहांची विल्हेवाट लावण्यासाठी जागा संपादन करणे, बदलणे, अशा जागांची व्यवस्था पाहणे व आवश्यक ते नियंत्रण कार्य पार पाडणे.

10) सार्वजनिक रस्ते, गटारी, बाजार, कत्तलखाने, स्वच्छतागृहे, स्नानाची ठिकाणे, कपडे धुण्याची ठिकाणे, पिण्याच्या पाण्याची तळी, विहिरी, बंधारे या सर्वांची व्यवस्था, स्वच्छता राखणे व देखभाल करणे.

11) शहरातील नागरिकांना पिण्यासाठी योग्य व पुरेसा पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था करणे. दुषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका पाहोचणार नाही याची काळजी घेणे.

12) शहरातील रस्त्यांना नावे देणे व जागांना क्रमांक देणे.

13) जन्म व मृत्यूची नोंद ठेवणे.

14) नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी सार्वजनिक लस टोचणी कार्यक्रम हाती घेणे.

15) सार्वजनिक दवाखाने उघडणे व त्यांची व्यवस्था ठेवणे; तसेच सार्वजनिक वैद्यकीय मदतीची तरतूद करणे.

16) कुटुंब नियोजन केंद्र चालविणे तसेच लोकसंख्या नियंत्रण, कुटुंब कल्याण कार्यक्रम यांना उत्तेजन देणे.

17) शहरात प्राथमिक शाळा उघडणे, त्यांची व्यवस्था लावणे व त्यावर देखरेख ठेवणे.

18) शहरातील घाण व केरकचरा यांची विल्हेवाट लावणे तसेच राज्य शासनाने तसा आदेश दिला आल्यास घाण व केरकचरा यांपासून मिश्रखत तयार करणे.

19) नगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या राहणीमानात व काम करण्याच्या ठिकाणी सुधारणा घडवून आणण्यासाठी राज्य शासनाकडून वेळोवेळी सुचविण्यात येईल त्यानुसार उपाययोजना करणे.

20) नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीत राहणा–या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती यांच्यासाठी कल्याणकारी कार्यक्रम हाती घेणे. तसेच या वर्गाच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी राज्य शासन वेळोवेळी सांगेल त्याप्रमाणे उपाययोजना करणे.

21) सांसर्गिक किंवा घातक रोगाने आजारी असलेल्या व्यक्तींना विशेष वैद्यकीय साहायता उपलब्ध करून देणे; तसेच अशा रोगांचा शहरात फैलाव होऊ नये यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करणे.

22) नगरपालिका क्षेत्रात टंचाईच्या परिस्थितीत लोकांना आवश्यक ते सहायता करणे आणि गरजू लोकांसाठी टंचाई निवारणाची कामे हाती घेणे.

23) राज्य शासनाच्या आदेशाप्रमाणे नगरपालिकेच्या प्रशासनाबाबतचा वार्षिक अहवाल तयार करणे.

24) अधिनियमातील कलम 105 मध्ये दिलेले सक्तीचे कर बसविणे.

**ब) नगरपालिका व नगरपालिका कार्यशासनाची ऐच्छिक कर्तव्य व कार्ये :–**

नगरपालिकेस स्वेच्छानिर्णयानुसार खालील गोष्टींसाठी नगरपालिकेच्या मालमत्तेतून आणि निधीतून पूर्णतः किंवा अंशतः तरतूद करता येईल. नगरपालिकेची ऐच्छिक कार्ये ही तिच्या मालमत्तेतून किंवा निधीतून केलेल्या तरतूदींव्दारे पार पाडली जातात. म्हणजेच नगरपालिकेच्या आर्थिक क्षमतेनुसार अशी कामे हाती घेण्याचा निर्णय तिला घ्यावा लागतो. तिच्या ऐच्छिक कामांपैकी महत्वाची कामे आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील. :–

1) शहराच्या कोणत्याही भागात नव्या सार्वजनिक रस्त्यांची आखणी करणे आणि असे रस्ते तयार करण्यासाठी जागा संपादन करणे.

2) वरीलप्रमाणे नव्याने तयार करावयाच्या रस्त्याच्या बाजूला इमारती बांधण्यासाठी गरजेनुसार जागा संपादन करणे.

3) शहराजील गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करणे आणि त्यांचा दर्जा वाढविणे.

4) शहराच्या क्षेत्रातील गरिबी कमी करण्यासाठी उपाययोजना करणे.

5) गुरांसाठी कोंडवाडे तयार करणे आणि जनावरांना क्रूरपणे वागविण्यास प्रतिबंध करणे.

6) सार्वजनिक रूग्णालये, पूर्व प्राथमिक शाळा, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, ग्रंथालये, वस्तुसंग्रालये, व्यायाम शाळा यांची स्थापना करणे किंवा व्यवस्था ठेवणे. तसेच त्यांच्यासाठी इमारती बांधणे व त्यांची व्यवस्था ठेवणे.

7) वेडयांची इस्पितळे आणि अपंग व निराश्रित यांच्यासाठी आश्रयस्थाने स्थापन करणे व त्यांची व्यवस्था ठेवणे.

8) नगरपालिका हद्दीत नगरसभागृहे, नगरपालिका कार्यालये, दुकाने, धर्मशाळा, खुली नाटयगृहे, प्रेक्षागारे व विश्रामगृहे बांधणे व त्यांची व्यवस्था ठेवणे.

9) सार्वजनिक उद्याने व बगीचे यांची आखणी करणे व त्यांची व्यवस्था ठेवणे.

10) रस्त्याच्या कडेने झाडे लावणे आणि त्यांची व्यवस्था ठेवणे.

11) लोकांना संगीत ऐकण्याच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणे.

12) नगरपालिका क्षेत्रात जनगणना करणे.

13) चराईची मैदाने संपादन करणे व ती सुस्थितीत ठेवणे तसेच दुग्धशाळा स्थापन करणे व त्या सुस्थितीत ठेवणे.

14) नगरपालिकेच्या कर्मचा—यांसाठी निवासस्थानाची तरतूद करणे.

15) नगरपालिकेचे कर्मचारी आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांच्या कल्याणचे संवर्धन करणे.

16) शहराच्या हद्दीत गरीब लोकांसाठी आरोग्यदायक निवासस्थाने बांधणे.

17) लोकांची ने—आण करण्यासाठी किंवा लोकांच्या शहरांतर्गत प्रवासाच्या सोयींसाठी यंत्रचलित वाहतुकीची साधने खरेदी करणे, ती सुस्थितीत ठेवणे आणि त्यांचा विस्तार करणे.

18) वीजपुरवठा किंवा गॅसपुरवठा करण्यासाठी कोणतीही बांधकामे करणे, ती सुस्थितीत ठेवणे आणि त्यांची दुरूस्ती करणे.

19) ग्रंथालये व वस्तुसंग्रहालये तसेच कोणत्याही शैक्षणिक संस्था याशिवाय रूग्नालय दवाखाना किंवा सार्वजनिक वैद्यकीय मदत पुरविणारी तत्सम संस्था किंवा धर्मदाय स्वरूपाची कोणतीही संस्था यांची स्थापना करण्यासाठी किंवा त्या सुस्थितीत राखण्यासाठी अंशदाने देणे.

20) विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणा—या खाजगी प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा किंवा वसतीगृहे यांना अनुदान व देणग्या देणे.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

21) नगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांच्या हितासाठी दूध व दुग्धजन्य पदार्थ यांचा पुरवठा करणे किंवा त्यावर प्रक्रिया करणे यासाठी दुग्धशाळा स्थापन करणे.

22) नगरपालिका क्षेत्रातील कोणताही समारंभ, जत्रा, करमणुकीचे कार्यक्रम किंवा प्रदर्शन तसेच गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यासाठी सत्कार–समारंभ यांचे नियमाने ठरवून दिलेल्या खर्चाच्या मर्यादेत राहून आयोजन करणे.

**नगरपालिका व नगरपालिका कार्यशासनाची कर्तव्य व कार्यांवरील सारांश :–**

अशाप्रकारे नगरपालिकांचे विविध आवश्यक किंवा अनिवार्य कार्ये आणि ऐच्छिक कार्ये सांगीतली जातात. याव्यतिरीक्त प्रत्येक नगरपालिकेने, जे नगरपालिका क्षेत्रात राहत असतील किंवा नगरपालिका क्षेत्रातून काढून टाकण्यात आले असेल अशा फौजदारी प्रक्रिया संहिता, 1898 प्रकरण 34 अन्वये ज्यांच्या बाबतीत बंदिवासात ठेवण्यासंबंधी आदेश अमलात नसेल अशा वेडयांना आणि महारोग्यांना औषधोपचारासाठी योग्य ठिकाण म्हणून राज्य शासन अधिसूचनेव्दारे जाहीर करील अशा नगरपालिका क्षेत्रात किंवा नगरपालिकेच्या क्षेत्रातील किंवा क्षेत्राबाहेरील कोणत्याही वेडयांच्या उपचारगृहात किंवा रूग्णालयात किंवा आश्रयस्थान चरितार्थाकरीता, उपचार करण्याकरीता, राज्य शासन वेळोवेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे निर्देशित करील अशा दरांनी नगरपालिकेची मालमत्ता व निधी यातून पैसे दिले जातात. परंतु कोणत्याही वेडयास किंवा महारोग्यास वर सांगितल्याप्रमाणे कोणत्याही वेडयांच्या उपचारगृहात, रूग्णालयात किंवा आश्रयस्थानात दाखल करून घेण्याच्या निकटपूर्वी तो अशा नगरपालिका क्षेत्रात कमीत कमी एक वर्ष राहत नसेल तर, त्यास चरितार्थासाठी व त्याच्यावर औषधोपचार करण्यासाठी नगरपालिका या पोट–कलमान्वये जबाबदार राहणार नाही.

प्रत्येक नगरपालिकेने आपली स्वतःची पाणीपुरवठा योजना तयार करून ती योजना पाच वर्षात पूर्ण होईल असे प्रयत्न केलेले असतात. नगरपालिका क्षेत्रात राहणा–या रहिवाशांसाठी पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रत्येक नगरपालिकेची आहे. प्रत्येक व्यक्तीस दर दिवशी सत्तर लिटरपेक्षा कमी नसमल इतके पाणी उपलब्ध करून देण्यासाठी ती योजना असते. जर पैशाअभावी नगरपालिका पाणीपुरवठा योजना तयार करू शकत नसेल तर ठराविक मुदतीच्या आत तसे शासनास कळविणे आवश्यक आहे. शासनाच्या चौकशीनंतर काही अटींवर राज्य सरकार पाणीपुरवठा योजना पूर्ण करीत असते. त्यासाठी नगरपालिकेने आपल्या उत्पन्नातील ठराविक भाग 'पाणीपुरवठा राखीव निधी' मध्ये जमा केले जातात. नगरपालिकेने योजना तयार करण्यास किंवा ती अमलात आणण्यास कसूर केल्यास तिने आपले कर्तव्य पार पाडण्यास कसूर केला असे गृहीत धरण्यात येते.

# संदर्भ ग्रंथ सूची


- **Bansod Rajesh (2019):** An Analytical Study of Financial Administration of Municipal Councils in Gondia District (Period: 2000-01 to 2010-11), Our Heritage, pp 2036-2046
- **Bansod Rajesh (2015):** An Analytical Study Of Financial Administration Of Municipal Councils In Gondia District, Review of Research, pp 1-12.
- **Bansod** Rajesh (2015):An Analytical Study of Financial Position of Municipal Councils in Gondia District, Golden Research Thought, pp 1-4.
- **Bisen D.K and Kudnar N.S. (2013a):** Watershed development: a case study of drought prone village darewadi source, review of research [2249-894x] d, pp-1-6. https://arastirmax.com/en/publication/review-research/2/4/1-6-watershed-development-case-study-drought-prone-village-darewadi/arid/4ffdd843-ca6f-4276-9db1-1f094bb69d44

  **Bisen D.K and Kudnar N.S. (2013b):** A Sustainable Use and Management of Water Resource of the Wainganga River Basin: - A Traditional Management Systems. figshare. Journal contribution. https://doi.org/10.6084/m9.figshare.663573.v1
- **Bisen D.K and Kudnar N.S. (2013c):** The production, export and catchment areas market of onion in Indian agriculture, Research Expo International Interdisciplinary Journal, Volume III, Issue IV, pp-39-44.
- **Bisen D.K and Kudnar N.S. (2013d):**Paradigm shift in the field of Higher Education,Monthly Multidisciplinary Research Journal, Golden Research Thought, pp 1-5.
- **Kudnar N. S. (2017):** Morphometric Analysis of the Wainganga River Basin Using Traditional & GIS Techniques, Ph.D. Thesis, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur, Pp 66-250.
- **Kudnar, N. S., (2015)** Linear Aspects of the Wainganga River Basin Morphometry Using Geographical Information System, Monthly Multidisciplinary Online Research Journal Review of Research, pp 1-9. http://oldror.lbp.world/UploadedData/1929.pdf
- **Kudnar, N. S., (2015):** Morphometric Analysis and Planning for Water Resource Development of the Wainganga River Basin Using Traditional & GIS Techniques, University Grants Commission Minor Research Project, pp 12-120.
- **Kudnar, N. S., (2019):** Impacts of GPS-Based Mobile Application for Tourism: A Case Study of Gondia District, Vidhyawarta, Peer-Reviewed International Publication, PP-19-22.

- **Kudnar, N.S. & Rajasekhar, M, (2019):** A study of the morphometric analysis and cycle of erosion in Waingangā Basin, India, Model. Earth Syst. Environ. (2019). https://doi.org/10.1007/s40808-019-00680-1
- **Kudnar, N. S., (2018):** Water Pollution a Major Issue in Urban Areas: A Case Study of the Wainganga River Basin". Vidyawarta International Multidisciplinary Research Journal, pp 78-84.
- Prof. V. B. Patil - Maharashtra Panchayat Raj Nagari Local Self Government Institutions in Maharashtra.- K. Sagar Prakashan, Pune.
- Dr. G. S. Badhe- Origin and sale of Indian Local Self Government Institutions- Himalaya Prakashan House, Mumbai.
- Dr. Shantaram Bhogle - Local Government in India - Vidyaprakashan, Nagpur 2
- Shri Dinesh Nakhate- Gondia District Pride.
- Gondia District Gazetteer.
- Bhandara District Gazetteer.
- Shri Rajesh Khandelwal - Garudzep - Citizen Sports Society, Gondia.
- Mr. V. N. Swami and Mrs. Madhavi Kavi- Vidyabharati Talathi - Complete guidance of Clerical Audit- Vidyabharti Prakashan, Latur.
- Lokmat- Newspaper, 10 November, 2011.